पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १०२**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १२/०२/२०१९** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार**, दिनांक **१२/०२/२०१९** रोजी दुपारी **०२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड – सभापती
२. मा.अमित राजेंद्र गावडे
३. मा.गावडे राजेंद्र तानाजी
४. मा.आंगोळकर सागर सुनिल
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – मा.आयुक्त, मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त(१), मा.गावडे – प्र.अतिरिक्त आयुक्त(२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा अधिकारी, मा.पाटील, मा.तुपे, मा.निकम– सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.पंडित – अधिष्ठता YCMH, मा.इंगळे,

मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.राणे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(पिं.चिं.मनपाची Smart Cities Best Digital Payments Innovator Award 2018 साठी निवड झालेने मा.आयुक्त, मा.मुख्य लेखा अधिकारी व मुख्य माहिती व तंत्रज्ञान विभाग अधिकारी यांचा व कु.साई सुधीर कवडे, वय वर्ष ९ याने अफ्रिकेचे सर्वोच्च शिखर किलो मांजरो चढाई केलेबद्दल मा.स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती, स्थायी समिती यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.)

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.७१) मा.स्थायी समिती सभेबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७२) मे.शिल्पी आर्किटेक्ट एंड प्लानर्स यांची मनपाचे रस्ते परिपूर्ण विकसीत करणेच्या अभियांनाच्या पॅनेलवर नेमणूक करणेबाबत - मा.राजेंद्र गावडे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७३) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६८४ दि.२७/११/२०१८ दुरूस्तीबाबत - मा.करूणा चिंचवडे, मा.यशोदा बोईनवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७४) निविदा क्र.२/१५-१६ वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत - मा.सागर आंगोळकर, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७५) तरतूद वर्गीकरणाबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७६) पिं.चिं.मनपाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतूक करणे कामाकरिता दाखल झालेल्या Writ Petition No.13820/2018 करिता मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निकालाचे अवलोकन होणेबाबत. (Request for Proposal (R.F.P.) नि.नो.क्र.१०/२०१७-१८)

विषय क्र.७७) चिंचवड गावठाण व मोरया मंदिर परिसर विकास व सुशोभिकरण कामानिमित्त पाहणी दौ-यांचे मान्यतेबाबत.

----------

दि.०५/०२/२०१९ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १०१)** चा सभावृत्तांत कायमकरणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -४३३१ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – जलनि:सारण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२३६/२०१९ दि.३०/०१/२०१९

विषय - कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.९ खराळवाडी मधील कामगार नगर, अक्षय-विहार सोसायटी, सोनकर सोसायटी, भक्ती सोसायटी परिसर व उर्वरित भागात मलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३२ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/८९/२०१९ दि.०१/०२/२०१९

विषय - मनपाचे आरोग्य व उद्यान विभागास आवश्यक हॅंगींग लिटरबीन्स खरेदीबाबत.

विषय क्र.२ दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३३ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/६/कावि/८३/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे सुरक्षा विभागास आवश्यक एक्सरे बॅगेज इन्स्पेक्शन सिस्टीम (स्मॉल साईज) मशीन साहित्य खरेदीबाबत ई निविदा सुचना क्र.15/2018-19 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. सदर निविदेकरीता तीन निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदे अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.ईव्हॉल्व टेक्नॉलॉजिस अण्ड सर्विसेस प्रा.लि. यांचे निविदेतील बाब क्र.1 या साहित्याचे लघुत्तम प्रति नग दर र.रू.13,15,169/- प्रमाणे एकुण दर र.रू 26,30,338/- चे दर हे अंदाजपत्रकीय दर एकूण र.रू.34,00,000/-(अक्षरी र.रू. चौतीस लाख फक्त) पेक्षा -22.64 % ने

कमी असल्याने स्विकृत करुन सदर पुरवठाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३४ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – ब क्षेत्रीय आरोग्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.बक्षेका/५/कावि/६०/२०१९ दि.३१/०१/२०१९

विषय - निविदा नोटीस क्र.३/२०१५-१६ नुसार अतिरिक्त १ वाहनांसाठीच्या येणा-या खर्चाबाबत.

विषय क्र.४ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३५ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य क/ह मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७८/२०१९ दि.०२/०२/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.60/7/2018-19 अन्वये प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी मधील PCNDTA ब्रीज ते टाटा मोटर्स कार प्लॅन्ट रस्ता डांबरीकरण आणि चेंबर व्यवस्था करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.75,35,535/- (अक्षरी र.रु.पंच्याहत्तर लाख पस्तीस हजार पाचशे पस्तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.74,56,035/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.74,56,035/- पेक्षा 27.77% कमी म्हणजेच र.रु.53,85,494/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.10,600/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,900/- = एकुण र.रु.54,64,994/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३६ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/८/१६/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील आरक्षण क्र.जी.पी.१३२(बस टर्मिनस) विकसित करणेबाबत सन २०१३-१४ रोजी पर्यंत विकास आराखडा विशेष योजनाअंतर्गत समावेश करण्यात आला होता. सदर कामाचा समावेश टप्पा २ च्या अंतर्गत केला होता. त्याअनुषंगाने टप्पा २ मधील कामांसाठी मे.पी.के दास यांचे वास्तुविशारद म्हणून संयुक्तरित्या नेमणूक करण्यात आली होती. मे.पी.के.दास यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक करून निविदा मागविणेचे काम सुरु होते. मे.पी.के.दास यांनी MIDC कडून सदर नकाशांना बांधकाम परवानगी घेतली आहे. सदर कामांतर्गत मा.आयुक्त सो यांचे दि.१५/०७/२०१५ रोजीच्या मान्य प्रस्तावानुसार त्यांनी केलेल्या कामाचे र.रु.२५ लाख बिल कौंसिल ऑफ आर्किटेक्टचे नियमानुसार अदा केले आहे. सदर कामांबाबत दि.३१/०८/२०१८ रोजीच्या आढावा बैठकीमध्ये मा.आयुक्तसो. यांनी मे.पी.के.दास यांना प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील आरक्षण क्र.जी.पी.१३२ (बस टर्मिनस) बाबत सुधारित नकाशे व अंदाजपत्रके ७ दिवसांच्या आत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि वास्तुविशारद मे.पी.के. दास यांनी सदर बाबत कुठलेही प्रकारचे सुधारित नकाशे व अंदाजपत्रके सादर केलेले नाही. सदर कामाबाबत मा.नगरसदस्य यांचा सतत पाठपुरावा होत असल्याने सदर प्रकल्पाचे नकाशे व अंदाजपत्रके सादर करणेबाबत उपअभियंता (स्थापत्य) अ प्रभाग यांचे मार्फत इ मेल द्वारे दि.१४/०९/२०१८ रोजी मे.पी.के. दास यांना सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच सदर बाबत कार्यकारी अभियंता स्थापत्य यांनी वारंवार भ्रमणध्वनीद्वारे व तोंडी सूचना देऊन झाल्या आहेत. तरीही कुठलेही प्रकारचा प्रतिसाद वास्तुविशारद मे.पी.के.दास यांनी अद्यापर्यंत दिला नसल्यामुळे सदर बाबत मा. आयुक्तसो यांचे दि. १४/१२/२०१८ रोजीचे मान्य प्रस्तावानुसार त्यांची सदर कामासाठी वास्तुविशारद म्हणून केलेली नेमणूक रद्द करणेत आली आहे. सदरचा प्रकल्प वैशिष्ठपूर्ण असल्याने तांत्रिक दृष्ट्या प्रकल्पाची संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे तयार करणे, बांधकाम परवानगी घेणे, पूर्वगणन पत्रक, निविदा विषयक कामे करणे इ. निविदापूर्व कामे करणे करीता आर्किटेक्ट (वास्तु विशारद) ची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच आराखड्याप्रमाणे काम करून घेणे व त्यांचे मोजमापे घेऊन देयक तयार करणे, प्रकल्पांच्या दैनंदिन कामावर देखरेख करणे, निविदा पश्चात कामे करणे आवश्यक आहे. मनपाचे अभियंत्यांकडील इतर कामाचा व्याप पाहता व प्रकल्पाची वरील दैनंदिन कामे परिणामकारक होणेकरिता सदर प्रकल्पासाठी निविदापूर्व व निविदा पश्चात कामांकरिता आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार (PMC) असणे अत्यंत आवश्यक आहे. मे.के.बी.पी. सिव्हिल इंजिनीरिंग सर्विसेस यांनी दि.१०/०१/२०१९ व दि.२४/०१/२०१९ च्या पत्रान्वये काम करणेबाबत तयारी दर्शवली असून ते मनपाच्या आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार पॅनेलवर नोंदणीकृत आहेत. सदर कामासाठी यापूर्वी मे.पी.के.दास यांना र.रु.२५ लाख बिल अदा केले आहे. कौंसिल ऑफ आर्किटेक्ट चे नियमानुसार निविदापूर्व कामासाठी ०.५५% फी देय आहे. निविदा कार्यवाही पूर्ण

झाले नंतर ०.४५% फी देय आहे. मे.के.बी.पी.सिव्हिल इंजिनीरिंग यांना ऑडिटोरियम वगळून पुन्हा बांधकाम परवानगी घ्यावी लागणार आहे तसेच पूर्ण अंदाजपत्रक व निविदा कार्यवाही करावी लागणार आहे. सदर कामाची पूर्वी बांधकाम परवानगी झालेली असल्याने निविदापूर्व व निविदापश्चात आर्किटेक्ट कामासाठी १.८१३% व प्रकल्प सल्लागार (PMC) म्हणून १.३५% फी मनपाच्या प्रचलित दरानुसार अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३७ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – झोनिपु स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/८७/२०१९ दि.३१/०१/२०१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/४०-२०१८-१९ मधील अ.क्र.३० अन्वये प्रभाग क्र.२० मधील लांडेवाडी झोपडपडपट्टीतील टेल्को रोड नजीकचे जुने शौचालय पाडून नवीन शौचालय बांधणेकामी मे.दिपक बाळकृष्ण जाधव नि.र.रु.२९,६७,९३५/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख सदुसष्ठ हजार नऊशे पस्तीस फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळुन र.रू.२८,९५,७६५/- वर निविदा मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रू.२८,९५,७६५/- पेक्षा १५.९१% कमी म्हणजेच र.रु.२४,३५,०४८/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.२२,२४०/- मटेरीयल टेस्टींग चार्जेस र.रु.४९,९५०/- = एकुण र.रु.२५,०७,२३८/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा कर्णेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमामुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३८ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/१६२/२०१९ दि.०२/०२/२०१९

विषय – पिंपरी चिंचवड मनपाचे वैदयकिय मुख्य कार्यालय व अंतर्गत दवाखाना/रुग्णालय विभागांकरीता आवश्यक संगणक संच खरेदीबाबत.

विषय क्र.८ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३३९ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/१२७/२०१९ दि.०४/०२/२०१९

विषय - ई क्षेत्रिय विद्युत कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मनपाचे इमारती कार्यालये, शाळा, नाट्यगृहे इत्यादी मध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४० विषय क्रमांक – १०

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – सुरक्षा विभाग

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/१२२/२०१९ दि.०४/०२/२०१९

विषय - ई निविदा सुचना क्र.२/२०१६-१७ मधील अट क्र.४५ अन्वये मे.नॅशनल सिक्युरीटी सर्व्हीसेस यांना ठेकेदारी पध्दतीने मनपा मिळकतींवर ७१५ रखवालदार मदतनीस पुरविणेकामी देणेत आलेल्या कामकाजाचा पुढील (१) एक वर्षासाठी नविन करारनामा करणेत येवून त्यानुसार आदेश निर्गत करणेबाबत.

विषय क्र.१० चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४१ विषय क्रमांक – ११

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – सुरक्षा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/१२१/२०१९ दि.०४/०२/२०१९

विषय - ई निविदा सुचना क्र.१/२०१६-१७ मधील अट क्र.४५ अन्वये मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस यांना ठेकेदारी पध्दतीने ट्रफिक वार्डन पुरविणेकामी देणेत आलेल्या कामकाजाचा पुढील (१) एक वर्षासाठी नविन करारनामा करणेत येवून त्यानुसार आदेश निर्गत करणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४२ विषय क्रमांक – १२

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – सुरक्षा विभाग

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/१२३/२०१९ दि.०४/०२/२०१९

विषय - ई निविदा सुचना क्र.३/२०१६-१७ मधील अट क्र.४७ अन्वये मे.सैनिक इंटेलिजन्स सिक्युरीटी सर्व्हीसेस प्रा.लि.यांना ठेकेदारी पध्दतीने मनपा शाळांना ३१६ रखवालदार मदतनीस पुरविणेकामी देणेत आलेल्या कामकाजाचा पुढील (१) एक वर्षासाठी नविन करारनामा करणेत येवून त्यानुसार आदेश निर्गत करणेबाबत.

विषय क्र.१२ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४३ विषय क्रमांक – १३

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२४९/२०१९ दि.०४/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/25/2018-19 अन्वये वार्ड क्र.२६ पिंपळे निलख व वाकड येथील भाऊसाहेब कलाटेनगर व विष्णूदेनगर येथे जलनिःसारण नलिका टाकणेकामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.37,49,595/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख एकोणपन्नास हजार पाचशे पंच्याण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,49,554/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,49,554/- पेक्षा 12% कमी म्हणजेच र.रु.32,99,608/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.42/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.32,99,650/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४४ विषय क्रमांक – १४

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२४८/२०१९ दि.०४/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/137/2018-19 अन्वये वार्ड क्र.२६ पिंपळे निलख भागातील परीसरात जलनिःसारण नलिकांची कामे करणेकामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.37,49,595/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख एकोणपन्नास हजार पाचशे पंचाण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,49,553/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,49,553/- पेक्षा 11.5% कमी म्हणजेच र.रु.33,18,354/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.42/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.33,18,396/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४५ विषय क्रमांक – १५

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/८१/२०१९ दि.०५/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालया कडील निविदा नो.क्र.37-2018/19 मधील अ.क्र.1 अन्वये थेरगाव बापुजीबुवानगर येथील पिंपरी चिंचवड महानगरापलिकेच्या दिलिप वेंगसरकर अकॅडमीच्या पॅव्हेलियनचे उर्वरित काम करणेकामी (विद्युत विषयक कामे करणे) मे.शार्दुल इंजिनिअरिंग नि.र.रू.30,43,832/- (अक्षरी र.रू.तीस लाख त्रेचाळिस हजार आठशे बत्तीस फक्त) पेक्षा 12.60% कमी, या ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४६ विषय क्रमांक – १६
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/८२/२०१९ दि.०५/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा नो.क्र.37-2018/19 मधील अ.क्र.5 अन्वये प्रभाग क्र.27 मधील धर्मवीर संभाजी उद्यान येथे विविध विद्युत विषयक कामे करणेकामी मे.कमल इलेक्ट्रीक इंटरप्रायजेस नि.र.रू.40,40,449/- (अक्षरी र.रू. चाळीस लाख चाळीस हजार चारशे एकोणपन्नास फक्त) पेक्षा 13.19% कमी या ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४७ विषय क्रमांक – १७
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/०४/२०१९ दि.०४/०२/२०१९

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी आवश्यक प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रीका छपाईचे कामकाजासाठी माध्यमिक शिक्षण विभागाकडील ई-निविदा क्रं 01/2017-18 अन्वये दिनांक 16/3/2018 ते 15/03/2019 या कालावधीसाठी मे.विशाल एंटरप्रायजेस, रहाटणी यांचेशी दर करार केलेला असून सदर निविदेतील बाब क्रं 01, 02, 04, 14 व 15 चे या बाबींचे प्राप्त लघुत्तम मंजुर दरानुसार प्राथमिक शिक्षण विभागासठी मे.विशाल एंटरप्रायजेस, रहाटणी या निविदाधारकाकाडून एकुण र.रु.8,98,536/- मध्ये छपाईचे कामकाज करुन घेणेकामी करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. तरी, सदरच्या छपाईच्या कामकाजासाठी येणा-या र.रु.8,98,536/- (अक्षरी र.रु.आठ लाख अठ्यान्नव हजार पाचशे छत्तीस फक्त) चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४८ विषय क्रमांक – १८
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/१७६/२०१९ दि.०५/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.73-4-2018-19 अन्वये प्रभाग क्र.१० मोरवाडी परिसरातील रस्त्यांचे मजबुतीकरण/सुधारणा/नुतनीकरण/कॉंक्रिटीकरण करणेकामी मे.सिध्धीकी पब्लिंग अँड ड्रेनेज सिव्हील कॉंक्ट्रक्टर नि.र.रू.62,58,368/- (अक्षरी र.रु.बासष्ठ लाख अठ्ठावन्न हजार तीनशे अडुसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.61,95,768/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.61,95,768/- पेक्षा 27.10% कमी म्हणजेच र.रु.45,16,715/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.62,600/- = एकुण र.रु.45,79,315/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३४९ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/२५९/२०१९ दि.०४/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (1 ते 18) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३५० विषय क्रमांक – २०

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.इक्षेका/नि-६/कावि/१०३/२०१९ दि.०४/०२/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाकडील विदयुत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ (१ ते १५) मधील नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -४३५१ विषय क्रमांक – २१
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र से.२३
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/३२/२०१९ दि.०५/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२ व केमिकॅल हाऊस खाजगीकरणाने चालविणे हे काम मे.श्री. विनय इंजिनियरिंग सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमार्फत करणेत येत आहे. या कामाकरिता एक महिना (०५/०३/२०१९ पर्यंत) मुदत वाढीच्या कालावधीसाठी व तसेच मा.आयुक्त सो. यांचे कडील आदेशक्र.काक/३/कावि/१५४/२०१८, दि.२८/०६/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ च्या अधिसूचनेनुसार दर महा किमान वेतन अदा करणेबाबत किमान वेतन काय़दा १९४८ नुसार कामगारांची वेळोवेळी होणारी वेतनामधील दरवाढ गृहीत धरून येणा-या सुमारे र.रु.३३,१०,०००/- (सुधारित एकूण र.रु.२,१०,०७,८३३/- - र.रु.१,७६,९७,८३३/- = र.रु.३३,१०,०००/-) चे वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३५२ विषय क्रमांक – २२
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र से.२३
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/३३/२०१९ दि.०५/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२,३,४ व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणेच्या नवीन कामाची निविदा प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सदर निविदा कार्यवाही करिता अधिक कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे हे काम मे.श्री विनय इंजिनियरिंग सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमार्फत करणेत येत आहे. या कामाकरिता एक महिना (०५/०३/२०१९ पर्यंत) मुदत वाढीच्या कालावधीसाठी व तसेच मा.आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.काक/३/कावि/१५४/२०१८, दि.२८/०६/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ च्या अधिसूचनेनुसार दर महा किमान वेतन अदा करणे बाबत किमान वेतन काय़दा १९४८ नुसार कामगारांची वेळोवेळी होणारी वेतनामधील दरवाढ गृहीत धरून येणा-या सुमारे र.रु.३०,००,०००/- (सुधारित एकूण र.रु.१,६९,१३,२००/- - र.रु.१,३९,१३,२००/- =

र.रु.३०,००,०००/-) चे वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३५३ विषय क्रमांक – २३

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/४३/२०१९ दि.०६/०२/२०१९

मा.अति. आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV3/1-2018-19 अन्वये कासारवाडी ४० द.ल.लि. मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा-२ चे चालन देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे. ग्लोबल इनव्हायरोज यांचेकडुन नि.र.रु.२,६३,५५,४५६/- (अक्षरी र.रु.दोन कोटी त्रेसष्ट लाख पंचावन्न हजार चारशे छप्पन्न फक्त) पेक्षा -१४.००% कमी या दराने र.रु.२,२६,६५,६९२/- पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदेतील अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३५४ विषय क्रमांक – २४

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/६/कावि/८९/२०१९ दि.०६/०२/२०१९

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध लॅम्प साहित्य खरेदीबाबत ऑनलाईन प्रसिध्द केलेल्या ई निविदा क्र.21/2018-19 अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. सदर निविदेस एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदे अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.पायोनियर सेल्स यांचे बाब क्र.1 या साहित्याचे लघुत्तम दर र.रू.18,000/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.20,000/- या दरापेक्षा -10% ने कमी आहेत सदर दर व लघुत्तम निविदाधारक मे.शक्ती फिक्सचर्स प्रा.लि.यांचे बाब क्र.2, 3, 4, 5, 6, 7 व 8 चे प्रमाणे एकुण 07 बाबी साहित्यांचे प्राप्त लघुत्तम दर र.रू.15,87,540/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.20,56,600/- पेक्षा -22.81% ने कमी आहेत. याप्रमाणे सदर एकुण 1 ते 8 बाबी विविध लॅम्प साहित्यांचे प्राप्त लघुत्तम एकुण दर र.रू.16,05,540/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.20,76,600/- (अक्षरी र.रू.वीस लाख शहात्तर हजार सहाशे) पेक्षा -22.68% ने कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार मे.पायोनियर सेल्स व मे.शक्ती फिक्सचर्स प्रा.लि. यांचेकडून करारनामा करुन घेणेत आला असून त्यांना पुरवठा आदेश

निर्गत करण्यात आलेला असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या खर्चाची व संविदेची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३५५ विषय क्रमांक – २५

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – ब क्षेत्रीय स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षे/स्था/काविज/१२/३७६/२०१८ दि.१२/११/२०१८

विषय – चिंचवड गावठाण व मोरया मंदिर परिसर विकास व सुशोभिकरण कामानिमित्त पाहणी दौ-यास मान्यता देणेबाबत विषय क्र.२५ चे विषयपत्र मागे घेणेकामी मा.कार्यकारी अभियंता यांचे कडील पत्र क्र.बक्षेका/कावि/१२/३२/२०१९ दि.१२/२/२०१९ अन्वये सदरचे विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३५६ विषय क्रमांक – २६

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४८९/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची वैदु वस्ती व्यायामशाळा, पिंपळे गुरव हि वैदु समाज प्रबोधन मंडळ, पिंपळे गुरव यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.२६ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३५७ विषय क्रमांक – २७

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९८/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची श्री.भैरवनाथ व्यायामशाळा भोसरी व्यायामशाळा हि छत्रपती श्री शिवाजी तरूण मित्र मंडळ भोसरी ३९ यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.२७ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३५८ विषय क्रमांक – २८
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४८८/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - म.न.पा.ची कै.आनंदाराव लांडगे व्यायामशाळा धावडे वस्ती भोसरी ही व्यायामशाळा सिध्देश्वर युवा क्रांती मित्र मंडळ भोसरी ३९ यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.२८ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३५९ विषय क्रमांक – २९
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४८७/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची कचदेव सिताराम लोंढे विट भट्टी व्यायामशाळा, भोसरी हि लोंढे तालीम मित्र मंडळ लोंढे आळी भोसरी यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.२९ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६० विषय क्रमांक – ३०
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९५/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची बालभवन व्यायामशाळा खराळवाडी हि सदानंद तरुण मित्र मंडळ बजरंगनगर पिंपरी यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३० चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६१ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९४/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची कै.संजय काळे हेल्थ क्लब निगडी हि व्यायामशाळा संग्राम स्पोर्टस

क्लब, से.नं.२८, प्राधिकरण यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३१ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९३/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची संभाजीनगर व्यायामशाळा, संभाजीनगर चिंचवड हि साई शारदा महिला बचत गट, चिंचवड यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३२ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९२/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची पिंपरी कॅम्प व्यायामशाळा, पिंपरी हि सुपर मित्र मंडळ पिंपरी कॅम्प यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३३ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६४ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९१/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची मुंजाबा चौक व्यायामशाळा, पिंपळे सौदागर हि गणेश मित्र मंडळ, पिंपळे सौदागर यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३४ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६५ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९०/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची शेवंताबाई साधु काशिद व्यायामशाळा, पिंपळे गुरव हि स्वामी समर्थ विवेकानंद मित्र मंडळ यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३५ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६६ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९७/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची मासुळकर कॉलनी व्यायाम शाळा पिंपरी ही व्यायामशाळा श्री छत्रपती शिवाजी मित्र मंडळ मासुळकर कॉलनी पिंपरी यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३६ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६७ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९६/२०१८ दि.२४/१२/२०१८

विषय - मनपाची लांडेवाडी भोसरी व्यायामशाळा ही व्यायामशाळा नव महाराष्ट्र तरूण मित्र मंडळ लांडेवाडी भोसरी ३९ यांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३७ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक -४३६८ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/८२/२०१९ दि.०६/०२/२०१९

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग क मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (1 ते 6) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३६९ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/८३/२०१९ दि.०६/०२/२०१९

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग ह मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1ते 8) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७० विषय क्रमांक – ४०

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/८४/२०१९ दि.०६/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.64/2/2018-19 अन्वये प्रभाग क्र.29 इंद्रायणीनगर मधील से.क्र.3 येथील स्केटींग रिंग चे उर्वरित स्थापत्य, विद्युत व अनुषंगिक कामे करणेकामी (दुसरा टप्पा) मे.लालदिप कन्स्ट्रक्शन नि.र.रू.1,86,37,570/- (अक्षरी र.रु.एक कोटी शहाऐंशी लाख सदोतीस हजार पाचशे सत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,85,61,568/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,85,61,568/- पेक्षा 4.50%जादा दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 1.17% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.1,93,96,839/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.31,802/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.44,200/- = एकुण र.रु.1,94,72,841/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस

मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७१ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२५४/२०१९ दि.०६/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/119/2018-19 अन्वये ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२४ थेरगाव मध्ये ड्रेनेज लाईन व चेंबर्सची देखभाल दुरुस्ती व इतर आकस्मितपणे उद्भवणारी जलनिःसारण विषयक कामे करणेकामी मे.एस.एस.एंटरप्रायजेस नि.र.रू.29,99,950/- (अक्षरी र.र.एकोणतीस लाख नव्याण्णव हजार नऊशे पन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,99,908/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,99,908/- पेक्षा 10.1% कमी म्हणजेच र.रु.26,96,917/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.42/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.26,96,959/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७२ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/४/कावि/४८/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील बायोमॅट्रीक मशीन देखभाल व दुरुस्तीकरीताई निविदा सूचना क्र.०९/२०१८-१९ प्रसिध्द करून दर मागविणेत आले होते त्यामध्ये मे.पोलेस्टार कंन्सलटींग प्रा. लि. यांचे र.रू.१७,४१,८३४/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर अंदाजपत्रकिय रकमे पेक्षा २.०५% कमी आहेत त्यास अंतर्गत लेखा परिक्षक यांचे दि.२८/९/२०१८ चे प्रस्तावान्वये स्विकृत केलेले आहेत मे.पोलेस्टार कंन्सलटींग प्रा. लि. यांचेकडून सन २०१८-१९ साठी बायोमॅट्रीक मशीन देखभाल व दुरुस्ती कामकाज १ वर्षे कालावधीत

करणेकामी र.रु.१७,४१,८३४/- (अक्षरी र.रू.सतरा लाख एक्केचाळीस हजार आठशे चौतीस फक्त) अधिक जी.एस.टी इतक्या रकमेचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७३ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/११५/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठरावा सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७४ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ड/ग मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१०६/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.67-05-2018-19 अन्वये नवीन प्रभाग क्र.२७ रहाटणी येथे पावसाच्या पाण्याचा निचरा होणे करिता ठिकठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.छोटेलाल चौहान नि.र.रू.1,66,15,191/- (अक्षरी र.रु.एक कोटी सहासष्ट लाख पंधरा हजार एकशे एक्याण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,65,72,193/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,65,72,193/- पेक्षा 25.12% कमी म्हणजेच र.रु.1,24,09,258/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.16,850/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.26,148/- = एकुण र.रु.1,24,52,256/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७५ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/१८१/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.73-24-2018-19 अन्वये मुख्य प्रशासकीय इमारतीची देखभाल दुरूस्तीची कामे करणेकामी मे.अनुष एन्टरप्राईजेस नि.र.रू.37,53,040/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख त्रेपन्न हजार चाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,37,237/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,37,237/- पेक्षा 19.65% कमी म्हणजेच र.रु.30,02,870/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.353/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.15,450/- = एकुण र.रु.30,18,673/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७६ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – म.सा.भांडार वैद्यकीय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/७७/२०१९ दि.०८/०२/२०१९

विषय - वाय.सी.एम.रुग्णालयातील व नविन आय.सी.यु. विभागाकरीता ECG 12 Lead Machine खरेदीबाबत.

विषय क्र.४६ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७७ विषय क्रमांक – ४७

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ड/ग मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१०७/२०१९ दि.०७/०२/२०१९

विषय - प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख मधील विविध आरक्षणे विकसीत करणेबाबत.

विषय क्र.४७ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -४३७८ विषय क्रमांक – ४८
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – वैद्यकीय मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/०१/कावि/१७०/२०१९ दि.०६/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत विविध दवाखाना/रूग्णालयमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे विविध अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता भरणेबाबत व जाहिरात प्रसिध्द करणेबाबत तसेच व भविष्यात वेळोवेळी रिक्त होणारी सर्व पदे Walk In Interview पध्दतीने मुलाखती आयोजित करुन भरणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३७९ विषय क्रमांक – ४९
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/१८२/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.65-5-2018-19 अन्वये प्रभाग.१४ काळभोरनगर, मोहननगर येथील स्वच्छतागृहांचे नुतनीकरण करणेकामी मे.अँडप्ट एन्टरप्राईजेस नि.र.रू.1,25,05,812/- (अक्षरी र.रु.एक कोटि पंचविस लाख पाच हजार आठशे बारा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,24,64,308/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,24,64,308/- पेक्षा 22.19% कमी म्हणजेच र.रु.96,98,478/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.16,254/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.25,250/- = एकुण र.रु.97,39,982/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८० विषय क्रमांक – ५०

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त (१) यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/१३४/२०१९ दि.०७/०२/२०१९

विषय - साई चौक (जगताप डेअरी) येथील चौकात समतल वितलग बांधणे, विद्युत विषयक कामे करणे प्रकाश व्यवस्था करणेबाबत.

विषय क्र.५० चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८१ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त (१) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/२७३/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.अति. आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.26/01/2018-19 अन्वये प्र.क्र.28 मधील नाशिक फाटा ते वाकड या बीआरटीएस रस्त्यावर गोविद गार्डन चौक येथे सबवे बांधणे या कामांतर्गत विद्युत विषयक कामे करणे या कामास तांत्रीक मान्यता व सदरचे काम करणेकामी मे.इलेक्ट्रो मॅकेनिक्स नि.र.रू.74,31,746/- (अक्षरी र.रू. चौ-याहत्तर लाख एकतीस हजार सातशे सेहेचाळीस फक्त) पेक्षा 17.17% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८२ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/१३५/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.अति. आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.Ele/Ho/C/32/5/2018-19 अन्वये प्रभाग क्र.2 वडाचा मळा परिसरातील ताब्यात आलेले DP रस्ते विकसित करणेकामी (विद्युत विषयक काम) मे.शांती इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.88,87,884/- (अक्षरी र.रु.अठ्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार आठशे चौ-याऐंशी फक्त) पेक्षा 15.78% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.74,85,376/- पर्यंत काम करून घेणेस, निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या

निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारकराहील. तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८३ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/१३३/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (1 ते 23) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजूर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८४ विषय क्रमांक – ५४

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – उद्यान विभाग

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/१७०/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.४/२०१८-१९ अन्वये मनपाच्या उदयान विभागास ३ वर्षे कालावधीसाठी आवश्यक असणारी खेळणी दरकरार (Rate Contract) पध्दतीने पुरविणे व बसविणेकामी मे.अरिहंत इंडस्ट्रियल कॉ.लि. या ठेकेदारांची निविदा र.रू.४,००,००,०००/- (अक्षरी र.रू. चार कोटी फक्त) पेक्षा ३टक्के कमी दराची निविदा मंजुर दराने तीन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.३,८८,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी अठठयाऐंशी लाख फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८५ विषय क्रमांक – ५५
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मुलेप/१/कावि/११६/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.पीएमसी-3003/1490 प्र.क्र.124/03/नवि-22 दि.19/4/2007 च्या शासन आदेशानुसार पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांचे परिवहन उपक्रमाचे विलीनीकरण करुन भारतीय कंपनी कायदा 1956 अन्वये पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित या अभिनामाची कंपनी स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एनयुआर-2013/प्र.क्र.338/नवि-33 दि.18/2/2014 च्या शासन आदेशाप्रमाणे (1) सदहू महापालिका परिवहन उपक्रमांतर्गत बस खरेदीवरील व्हॅट इत्यादी कर व परिवहन उपक्रमातील संचलन तूट (Operational Losses) मुळे होणारा खर्च हा स्वतःच्या उत्पन्नातून संबंधीत महापालिकांनी भरुन काढणे बंधनकारक राहील. (2) सदर संचलन तूट (Operational Losses) महापालिकेच्या मुख्य लेखापरीक्षक यांनी लेखापरीक्षण करुन प्रमाणित करणे बंधनकारक राहील असे शासन निर्णयानुसार निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षण विभागामार्फत लेखापरीक्षण केले असून त्यातील ठळक बाबी खालील प्रमाणे-

- महामंडळाचे सन 2017-18 चे एकूण प्रवासी उत्पन्न र.रु.585.26 कोटी
- महामंडळाचे सन 2017-18 चे एकूण खर्च र.रु.863.14 कोटी
- ढोबळ संचलन तूट र.रु.277.88 कोटी
- असंचलित उत्पन्न र.रु.73.26 कोटी
- एकूण संचलन तूट र.रु.204.62 कोटी

त्याच प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य लेखापरीक्षण कार्यालयाकडून पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन 2017-18 या आर्थिक वर्षातील र.रु.204.62 कोटी संचलन तूट (Operation Deficit) बाबत केलेला लेखापरीक्षण अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८६ विषय क्रमांक – ५६
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – लेखा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/४६/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी मुलेप/०१/कावि/१०३/२०१९ दिनांक ०१/०२/२०१९ अन्वये लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला असून सन२०१७-१८ ची संचलन तूट र.रु.२०४.६२ कोटी

असल्याचे अहवालात प्रमाणित केली आहे. सह व्यवस्थापकीय संचालक यांचेकडील पीएमपीएमेल/मुलेविअ/७२२० दि.१९/०३/२०१८ नुसार एकूण संचलनतूट र.रु.२०४,६२,१४,६२८/- (अक्षरी र.रु.दोनशे चार कोटी बासष्ट लाख चौदा हजार सहाशे अठ्ठावीस फक्त) मधून ४०%प्रमाणे र.रु.८१,८४,८५,८५१/- पैकी संचलनतूट र.रु.६६,००,००,०००/- कोटी पीएमपीएमएल यांना अदा करणेत आली असून उर्वरीत संचलनतूट र.रु.१५,८४,८५,८५१/- अदा करावयाचे आहेत. सन २०१७-१८ मध्ये देय होणारी संचलनतूट समायोजीत करुन उर्वरीत संचलनतूट र.रु.१५,८४,८५,८५१/- (अक्षरी र.रु.पंधरा कोटी चौ-याऐंशी लाख पंच्याऐंशी हजार आठशे एकाव्वन फक्त) दोन समान हफ्त्यात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८७ विषय क्रमांक – ५७

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता (वि) यांचे पत्र क्र.डक्षेका/३/कावि/१०३/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.कार्यकारी अभियंता (वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (1 ते 5) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८८ विषय क्रमांक – ५८

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षेका/आ१५/कावि/४३/२०१९ दि.०७/०२/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण – २०१९ चे अनुषंगाने कामकाज कालमर्यादीत/तातडीचे असलेने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक शौचालय व मुतारी यांच्या भिंतीवर डिजीटल पेंटीग करणे साठी कोटेशन नोटीस ०१/२०१८-२०१९ प्रसिध्द केली असता वरील प्रमाणे ठेकेदारांचे कोटेशन प्राप्त झाले आहेत प्राप्त झालेल्या ठेकेदारांपैकी मे.Can Image Media Tech या ठेकेदार संस्थेचे दर र.रु.७७/- प्रति चौ.फूट हे इतर प्राप्त झालेल्या ठेकेदार संस्थेपेक्षा कमी असलेने मे.Can Image Media Tech या ठेकेदार संस्थेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व

सार्वजनिक शौचालय व मुतारी यांच्या भिंतीवर डिजीटल पेंटीग करणे कामकाजासाठीचे दर स्विकारणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.०२/०१/२०१९ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.Can Image Media Tech या ठेकेदाराने एकुण २५६८ चौ.फूट या कामासाठी र.रु.७७/- प्रति चौ.फूट प्रमाणे एकुण र.रु.१,९७,७३६/- (अक्षरी र.रू. एक लाख सत्याण्णव हजार सातशे छत्तीस फक्त) दराने काम कामकाज केलेले आहे त्यानुसार मे.Can Image Media Tech या संस्थेबरोबर कलम ७३ (ड) नुसार करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३८९ विषय क्रमांक – ५९

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/४/कावि/३६/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनावर अधारित विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम व व्याख्यानांचे आयोजन भक्ती-शक्ती शिल्प समूह निगडी येथे तीन दिवस करण्यात आले आहे. शालेय विद्यार्थीच्या विविध स्पर्धचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महानगरपालिकेच्या वतीने विविध ठिकाणी प्रबोधनपर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येणार आहे. सर्व उपक्रम राबविण्यासाठी र.रू.१८,६०,०००/-(अक्षरी र.रू.अठरा लाख साठ हजार फक्त) खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९० विषय क्रमांक – ६०

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/७६/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.74/05/2018-2019 अन्वये पुणे आळंदी रस्त्यावरील वडमुखवाडी फाटा ते चोविसावाडी फाटा येथे कृषी खात्यावरील ताब्यात आलेल्या जागेवर रस्ता रुंदीकरण व नाल्याचे बांधकाम करणेकामी मे.अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नि.र.रू.21,66,74,359/- (अक्षरी र.रु.एकवीस कोटी सहासष्ठ लाख चौ-याहत्तर हजार तीनशे एकोणसाठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.20,76,92,439/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.20,76,92,439/- पेक्षा 5.50% कमी असा दर कमी करुन देण्यात आला असून त्यानुसार प्राप्त

निविदा दर 5.50% कमी दराची सन 2018-19 चे एस.एस.आर.दरानुसार निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 7.18% ने कमी येत असल्याने निविदा दरापेक्षा निविदा 5.50% कमी दराने म्हणजेच र.रु.19,62,69,355/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.66,36,320/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.23,45,600/- = एकुण र.रु.20,52,51,275/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९१ विषय क्रमांक – ६१

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/७९/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.44/07/2018-2019 अन्वये जुन्या हॅरीस ब्रिजची दुरुस्ती करणेकामी मे.टी.एन्ड.टी.इन्फ्रा लिमिटेड नि.र.रू.1,86,33,513/- (अक्षरी र.रु.एक कोटी शहाऐंशी लाख तेहत्तीस हजार पाचशे तेरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,85,61,341/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,85,61,341/- पेक्षा 24.50% जादा दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर.दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 9.57% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.2,31,08,870/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.44,872/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.27,300/- = एकुण र.रु.2,31,81,042/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९२ विषय क्रमांक – ६२
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/७८/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.74/02/2018-2019 अन्वये प्राजिमा 31 या रस्त्यावरील भूमकर चौक ते मनपा हद्दीपर्यंतच्या रस्त्यावरील स.नं.83 येथील जागा मनपाच्या ताब्यात आल्याने तेथे रस्ता रुंदीकरण करणेकामी मे.बहीरट ब्रदर्स नि.र.रू.2,33,84,823/- (अक्षरी र.रु.दोन कोटी तेहत्तीस लाख चौ-याऐंशी हजार आठशे तेवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,27,98,467/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2,27,98,467/- पेक्षा 12.88% कमी असा दर कमी करुन देण्यात आला असून त्यानुसार प्राप्त निविदा दर 12.88% कमी दराची सन 2018-19 चे एस.एस.आर.दरानुसार निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 13.91% ने कमी येत असल्याने निविदा दरापेक्षा निविदा 12.88% कमी दराने म्हणजेच र.रु.1,98,62,024/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.4,97,156/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.89,200/- = एकुण र.रु.2,04,48,380/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९३ विषय क्रमांक – ६३
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/७७/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.74/03/2018-2019 अन्वये सांगवी किवळे रस्त्यावरील साई चौक (जगताप डेअरी) ते पुनावळे चौक पर्यंतच्या रस्त्यावरील स्ट्रार्म वॉटर लाईन रस्त्याकडेला फुटपाथ लगत टाकणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रू.15,94,54,406/- (अक्षरी र.रु.पंधरा कोटी चौ-यान्नव लाख चोपन्न हजार चारशे सहा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.15,92,24,168/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.15,92,24,168/- पेक्षा 5.00% कमी असा दर कमी

करुन देण्यात आला असून त्यानुसार प्राप्त निविदा दर 5.00% कमी दराची सन 2018-19 चे एस.एस.आर.दरानुसार निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 7.17% ने कमी येत असल्याने निविदा दरापेक्षा निविदा 5.00% कमी दराने म्हणजेच र.रु.15,12,62,960/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,26,738/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,03,500/- = एकुण र.रु.15,14,93,198/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९४ | विषय क्रमांक – ६४

दिनांक – १२/०२/२०१९ | विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/४११/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.११/३६/२०१८-१९ अन्वये प्रभाग क्र.१७ मध्ये चिंतामणी चौकापासून गुरुमैया शाळेपर्यंत आवश्यक त्या डिझाईनप्रमाणे डी.आय.पाईपलाईन टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.रविंद्र कन्स्ट्रक्शन निविदा र.रू.४३,८५,०७१/- (अक्षरी र.रू.त्रेचाळीस लाख पंच्याऐंशी हजार एक्काहत्तर फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून र.रु.४३,८५,०७१/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.४३,८५,०७१/- पेक्षा २०.०६% कमी म्हणजेच र.रु.३५,०५,४२५/- + रॉयल्टीची र.रु.०/-, मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- = एकूण र.रु.३५,०५,४२५/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९५ विषय क्रमांक – ६५
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/४१८/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.११/५/२०१८-१९ अन्वये से.क्र.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्र टप्पा क्र.१, २, ३ व ४ ची स्थापत्य विषयक कामे करणे व इतर देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा र.रू.६१,०९,७३२/- (अक्षरी र.रू.एकसष्ट लाख नऊ हजार सातशे बत्तीस फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून निविदा र.रु.६०,९०,६७७/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.६०,९०,६७७/- पेक्षा २८.००% कमी म्हणजेच र.रु.४३,८५,२८७/- + रॉयल्टीची र.रु.१९,०५५/- मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम रु.०/- = एकूण र.रु.४४,०४,३४२/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९६ विषय क्रमांक – ६६
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/४१६/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.११/३७/२०१८-१९ अन्वये प्रभाग क्र.२४ येथील काळेवाडी पुलापासून भाटनगर एस.टी.पी.प्लॅन्ट पर्यंत १८ मी. रुंद रस्ता विकसित करणेकामी (अंतर्गत पाणी पुरवठा विभागाचे पाईपलाईनचे काम) मे.बजरंगबली कन्स्ट्रक्शन निविदा र.रू.१,१४,६८,४१०/- (अक्षरी र.रू.एक कोटी चौदा लाख अडुसष्ट हजार चारशे दहा फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून निविदा र.रु.१,१४,६६,२९०/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.१,१४,६६,२९०/- पेक्षा १२.२७% कमी म्हणजेच र.रु.१,००,५९,३७६/- + रॉयल्टीची र.रु.२,१२०/-, मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- = एकूण र.रु.१,००,६१,४९६/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार

भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९७ विषय क्रमांक – ६७

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/४१७/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.११/११/२०१८-१९ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.क्र.२३ येथील उर्वरित भाग विकसित करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा र.रू.५०,०४,४७१/- (अक्षरी र.रू.पन्नास लाख चार हजार चारशे एक्काहत्तर फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस वगळून र.रु.४९,३२,१४३/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.४९,३२,१४३/- पेक्षा ३०.००% कमी म्हणजेच र.रु.३४,५२,५००/- + रॉयल्टीची र.रु.२४,०२८/-, मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४८,३००/- = एकूण र.रु.३५,२४,८२८/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९८ विषय क्रमांक – ६८

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – जलनि:सारण

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२६३/२०१९ दि.०८/०२/२०१९

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ११) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल

या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३९९ विषय क्रमांक – ६९
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.सहा आयुक्त यांचे पत्र क्र.मभा/५/कावि/१५७/२०१९ दि.०२/०२/२०१९

मा.सहा आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे विविध विभागांकडील कॅनन कंपनीचे प्रिंटरसाठी आवश्यक Genuine Toner/Cartridge, Drum Unit खरेदीकामी केंद्र शासनाकडील Gem, government, e-market plus वर ऑनलाईन Bid Number-GEM/2018/B/126743 व Bid Number - GEM/2018/B/127499 अन्वये दर मागविणेत आले होते. त्यानुसार तीन बिडरकडून ऑनलाईन दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.ओम सिस्टीम, पुणे-१६ यांचे टोनर (कॅनन मेक) एकूण अकरा बाबींसाठी (एकूण २५१ नग) साहित्याचे दर एकूण र.रू.१५,३१,०८०/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा २०.६२% ने कमी आहे. प्रस्तूतकामी प्राप्त झालेले दर स्विकारणेत आलेले असून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४४०० विषय क्रमांक – ७०
दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभा/४/कावि/१०२/२०१९ दि.०८/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे आरोग्य विभागास आवश्यक साफसफाई साहित्य खरेदीकामी ई.नि.सु.क्र. 26/2018-19 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील 1. मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस यांचे एकुण बाबी 11 साठी एकुण र.रु.19,27,001/- 2. मे.पी.शेषाद्री एँड कंपनी यांचे एकुण बाबी 06 साठी एकुण र.रु.3,91,491/-, 3. मे.रेखा इंजिनिअरींग वर्क्स यांचे एकुण बाबी 08 साठी एकुण र.रु.17,28,807/-, 4. मे.आद्या प्रॉपर्टीज यांचे एकुण बाबी 04 साठी एकुण र.रु.66,477/- 5. मे सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कन्झुमर स्टोअर यांचे एकुण बाबी 04 साठी एकुण र.रु.98,110/- व 6. मे शुभम उद्योग यांचे एकुण बाबी 09 साठी एकुण र.रु.6,04,008/- असे एकुण र.रु.48,15,894/- (अक्षरी र.रु.अठठेचाळीस लाख पंधरा हजार आठशे चौ-याण्णव फक्त) दर प्राप्त झाले असुन प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.64,92,323/- पेक्षा 25.82 टक्केने कमी आहेत. सदरचे

दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -४४०१ विषय क्रमांक – ७१

दिनांक – १२/०२/२०१९

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

दि.१९/२/२०१९ रोजी शिवजयंती निमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने व दि.२०/२/२०१९ रोजी मा.महापालिका सभा असल्याने दि.१९/२/२०१९ ची मा.स्थायी समिती सभा दि.२१/२/२०१९ रोजी दु.२.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४४०२ विषय क्रमांक – ७२

दिनांक – १२/०२/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील अस्तित्वातील व नियोजित १८.०० मी. २४.०० मी, ३०.०० मी व ६०.०० मी.रूंद रस्ते परिपुर्ण विकसित करणेच्या अभियाना अंतर्गत तज्ञ सल्लागारांच्या नेमणुकीबाबत जाहिर प्रकटन देशातील व राज्यातीस वृत्तपत्रात प्रसिध्द करून प्राप्त प्रस्तावां पैकी पात्रता व अर्हता प्राप्त सल्लागारांची मनपा चे रस्ते परिपुर्ण विकसित करणेच्या अभियानाच्या पॅनेल वर प्रस्तावात नमूद प्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्र.३५७७ विषय क्र.१६ दि.५/११/२०१८ अन्वये मान्यता मिळाली आहे सदर पॅनेलवर नेमणूक होणेसाठी मे.शिल्पी आर्किटेक्ट एंड प्लानर्स त्यांची पात्रता व अर्हता लक्षात घेता व त्यांनी मनपात या पूर्वी केलेल्या कामाचा अनुभव लक्षात घेता मे.शिल्पी आर्किटेक्ट एंड प्लानर्स यांची यापुर्वी ठराव क्र.३५७७ अन्वये झालेल्या ठरावानुसार त्या सोबतच्या प्रस्तावात नमूद केल्या प्रमाणे मनपाचे रस्ते परिपुर्ण विकसित करणेच्या अभियांनाच्या पॅनेलवर नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४४०३ विषय क्रमांक – ७३

दिनांक – १२/०२/२०१९

सूचक – मा.करुणा चिंचवडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.करुणा चिंचवडे, मा.यशोदा बोईनवाड यांचा

मा.स्थायी समिती ठराव क्र.३६८४ दि.२७/११/२०१८ मध्ये प्रस्तुत विषयातील कामासाठी मे.जयगणेश एंटरप्राईजेस यांचेकडून अतिरिक्त एक टिपर वाहन दोन खेपा करणेसाठी दि.०१/०४/२०१८ पर्यंत त्या ऐवजी प्रस्तुत विषयातील कामासाठी मे.जयगणेश एंटरप्राईजेस यांचेकडून अतिरिक्त एक टिपर वाहन दोन खेपा करणेसाठी दि.३१/१२/२०१८ पर्यंत हा मजकूर समिविष्ट करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४४०४ विषय क्रमांक – ७४

दिनांक – १२/०२/२०१९

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यशाळा विभागाकडील निविदा क्र.२/१५-१६ (ड गट) र.रु.२.८५.००.०००/- (तीन वर्षासाठी) ५% कमी दराची असून मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१२३४७ दि.०१/०९/२०१५ अन्वये मंजूरी दिलेली आहे. या कामासाठी र.रु.२,९२,३५,८८७/- इतका खर्च झालेला आहे. स्विकृत रकमेपेक्षा र.रु.२१,६०,८८७/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख साठ हजार आठशे सत्याऐंशी फक्त) जादा खर्च झालेला आहे. तरी वाढीव रकमेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४४०५ विषय क्रमांक – ७५

दिनांक – १२/०२/२०१९

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

सन २०१८-१९ साठी नागरवस्ती विकास योजना विभागाकरीता ५ - इतर कल्याणकारी योजना या लेखाशिर्षांतर्गत असलेल्या १) खाजगी शाळेतील इ.१० वी १२ वीच्या विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवत्ती या उपलेखाशिर्षातील शिल्लक राहिलेल्या रकमेतून आवश्यक ती रक्कम महिला व बालकल्याण योजनेतील "पंडित दिनदयाळ उपाध्याय - महिलांसाठी ज्ञान कौशल्यवाढ कार्यक्रम" या उपलेखाशिर्षावर सन २०१८-१९ सालासाठीच्या "पंडित दिनदयाळ उपाध्याय महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" या योजनेसाठीच्या खर्चासाठी वर्ग

करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४४०६ विषय क्रमांक – ७६

दिनांक – १२/०२/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/११३/२०१९, दि.१२/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य मुख्य कार्यालयाकडील Request For Proposal (R.F.P) ई-नि.नो.क्र.१०/२०१७-१८ (दक्षिण भाग) यासाठी ए.जी. एन्वायरो इन्फ्राप्रोजेक्टस् प्रालि. यासंस्थेचे व नि.नो.क्र.११/२०१७-१८ (उत्तर भाग) यासाठी बी.व्ही.जी. इंडियालि. या संस्थेचे दर स्विकृत करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७८ व २२७९ दि.२१/०२/२०१८ व ठराव क्र.२३८६ व २३८५ दि.२८/०२/२०१८ अन्वये मान्यता दिलेली होती. या कामासाठी सदर दोन्हीं संस्थांचे करारनामे दि.२८/०२/२०१८ रोजी सील करणेत आलेले होते. तथापी मा.स्थायी समिती ठराव क्र.२५५१ व ठराव क्र.२५५२ दि.११/०४/२०१८ अन्वये या दोन्हीं कामांच्या निविदा रद्द करुन महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयानुसार ८ फेर निविदा काढण्यास मान्यता दिलेली होती. त्यानंतर ठराव क्र.२६२६ दि.०२/०५/२०१८ अन्वये ठराव क्र.२५५१ व २५५२ दि.११/०४/२०१८ मधील महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांप्रमाणे ८ फेर निविदा काढण्यास मान्यता दिलेली होती. त्यामध्ये दुरुस्ती करुन कचरा गोळा करणे व वाहतूक करणे या कामासाठी १) अ व फ क्षेत्रीय कार्यालय २) ब व ड क्षेत्रीय कार्यालय ३) क व इ क्षेत्रीय कार्यालय ४) ग व ह क्षेत्रीय कार्यालय याप्रमाणे ४ फेरनिविदा काढण्यास मान्यता देण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत १) नि.नो.क्र.०५/०१ /२०१८-१९ (अ व फ क्षेत्रीय कार्यालय) २) नि.नो.क्र.०५/०२/२०१८-१९ (ब व ड क्षेत्रीय कार्यालय) ३)नि.नो.क्र.०५/०३/२०१८-१९ (क व इ क्षेत्रीय कार्यालय) ४)नि.नो.क्र.०५/०४/२०१८-१९ (ग व ह क्षेत्रीय कार्यालय) याप्रमाणे ४ कामांची निविदा महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर दि.१७/०९/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर निविदा भरणेचा कालावधी संपुष्टात आलेनंतर दि.१४/११/२०१८ रोजी सदर निविदांचे पहिले पाकीट (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात आलेले आहे. दरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतूक करणे नि.नो.क्र.१०/२०१७-१८ (दक्षिण भाग) या निविदेकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.०६/१२/२०१८ रोजी AG Enviro Infra Projects Pvt. Ltd. यांनी रिट पिटीशन दाखल केलेली होती. मा.उच्च न्यायालयाने दि.०६/१२/२०१८ रोजीचे आदेशान्वये नि.नो.क्र.०५/०१ ते०४/२०१८-१९ या निविदांचे Commercial Bid उघडण्यात येवू नयेत असे आदेश दिलेले होते. त्यानंतर सदर रिट पिटीशन क्र.१३८२०/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी

दि.०६/०२/२०१९ रोजी खालील प्रमाणे निकाल दिलेला आहे.

“In the result, for the aforesaid discussion, we areinclined to allow this writ petition and quash and set aside thedecision taken by the Commissioner on 31.10.2018 and issuedirection to the respondent to implement the concluded contract executed with the petitioners on 28.02.2018 infurtherance the Resolution No.3313 passed by the StandingCommittee”

मा.उच्च न्यायालयाचे आदेश स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत. मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास खालील मुद्द्यांबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे.

